दिनांक – ११/०५/२०२२

## प्रेसनोट

आरोपीत श्री. सचिन अरूण हिरे, कार्यालयीन सहाय्यक (मानधन), जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती पालघर, ता.जि.पालघर यांस लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर यांनी घेतले ताब्यात.

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर |
| २ | गुन्हा नोंद पोलीस ठाणे | पालघर पोलीस ठाणे, जि.पालघर गुन्हा रजि. नं. १२६/२०२२ |
| ३ | कलम | भ्र.प्र.अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| ४ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आरोपीत श्री. सचिन अरूण हिरे, कार्यालयीन सहाय्यक (मानधन), जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती पालघर, ता.जि.पालघर |
| ५ | मागितलेल्या लाचेची रक्कम | ३०,०००/– रूपये<br>तडजोडीअंती २५,०००/– रूपये. |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | ---- |
| ७ | थोडक्यात हकिगत | आरोपीत लोकसेवक हे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती पालघर येथे कार्यालयीन सहाय्यक (मानधन) म्हणून कर्तव्यास असुन यातील तक्रारदार यांचे मित्राचे जात प्रमाणपत्र पडताळणी करून वैधता प्रमाणपत्र आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडुन मिळवून देण्यासाठी आरोपीत लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे ३०,०००/– रूपये लाचेची मागणी केली. परंतु तक्रारदार यांना आरोपीत लोकसेवक यास लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी दिनांक २८/०३/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर कार्यालयात तक्रार दिली होती.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक २८/०३/२०२२ रोजी आरोपी लोकसेवक यांचेकडे पंचासमक्ष पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे ३०,०००/– रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती २५,०००/– रूपये स्विकारण्याचे मान्य केल्याने पालघर पोलीस ठाणे येथे वरीलप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.<br>नमूद आरोपीत लोकसेवक श्री. सचिन अरूण हिरे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर यांचेकडून ताब्यात घेण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर यांचेशी संपर्क करावा.

---


संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर, पालघर प. ४०१४०४.
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– dypacbpalghar@gmail.com
ऑनलाईन तक्रार :– ––
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री नं. :– 1064
दुरध्वनी क्रमांक :– 02525-297297
व्हॉट्स ॲप क्र. :– 9923346810


(नवनाथ जगताप)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर

Scanned by CamScanner